समन्वय महर्षि

श्रीगुलाबरावमहाराजांनी स्पष्ट केलेला

# सर्व धर्म समन्वय

आणि

# षड् दर्शन समन्वय



''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

**लेखक : डॉ. कृष्ण माधव घटाटे**

कलिवर्ष : ५१०८ / इ.स.२००६

**रु. २०**



धर्माचा निर्विकार पद्धतीने विचार करणारा,

शूद्रवर्गात,

सृष्टीमध्ये,

मी एकटाच आहे,

असे तूं पक्के समज !

*(श्री गुलाबरावमहाराज : साधुबोध प्र..५६१)*

## ॥ ग्रंथोपलब्धि ॥

**श्रीगुलाबरावमहाराज भक्धिाम,**
चांदूरबाजार, जि. अमरावती. टेली. ०७२२७- २२४३१३१

**श्रीगुलाबरावमहाराज सर्वोदय ट्रस्ट,**
आळंदी (देवाची) ता.खेड, राजगुरुनगर, जि.पुणे
मो.- ९४२३००६२०८ / ९८२२४४०५९१

**सु. शं. फणसळकर,**
सिद्धान्त-अपार्टमेंट, बी-३, 'सुयोग-मंगल' च्या मागे शनिवारपेठ, पुणे ३०.
टेली.०२०-२४४८०६४५

**श्रीरंग घटाटे**
९-'गोकुळ' घटाटे ले आउट, व्हीआयपी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर.४४०००१
मो.९८२२२३५८७६ / टेली.०७१२-२५३३९९७

मुद्रक : ऋचा ग्राफिक्स, स्वा.सावरकर चौक, खामलारोड, नागपूर
*

www.gulabraomaharaj.org

समन्वय महर्षि

श्रीगुलाबरावमहाराजांनी स्पष्ट केलेला

# सर्व धर्म समन्वय

आणि

# षड् दर्शन समन्वय







''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

**लेखक : डॉ. कृष्ण माधव घटाटे**


प्रकाशक

**श्रीगुलाबरावमहाराज सर्वोदय ट्रस्ट, आळंदी**

।। श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळच्या अनुमतीने ।।

कलिवर्ष : ५१०८ / इ.स.२००६

रु. ३0




धर्माचा निर्विकार पद्धतीने विचार करणारा,

शूद्रवर्गात,

सृष्टीमध्ये,

मी एकटाच आहे,

असे तूं पक्के समज !

*(साधुबोध ५६१)*


**नारायण मोहोड / श्री तुळशीरामजी महाजन**

श्रीगुलाबरावमहाराज सर्वोदय ट्रस्ट, आळंदी (देवाची) ता.खेड, राजगुरुनगर, जि.पुणे

मो.- ९४२३००६२०८ / ९८२२४४०५९१

## ।। ग्रंथोपलब्धि ।।

**सु. शं. फणसळकर,**

सिद्धान्त-अपार्टमेंट, बी-३, 'सुयोग-मंगल' च्या मागे शनिवारपेठ, पुणे ३०.
टेली.०२०-२४४८०६४५

**श्रीरंग घटाटे**

९-'गोकुळ' घटाटे ले आउट, व्हीआयपी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर.४४०००१
मो.९८२२२३५८७६ / टेली.०७१२-२५३३९९७

मुद्रक : ऋचा ग्राफिक्स, स्वा.सावरकर चौक, खामलारोड, नागपूर

आवृति १ ली *इ.स. २००६

www.gulabraomaharaj.org

# ७. नीतिमीमांसाः युरोपीय आणि भारतीय

## प्रास्ताविक

श्रीगुलाबरावमहाराजांच्या समयोपदेश भाग १ व २, साधुबोध आणि पत्रे यामध्ये नीतिशास्त्राच्या तात्त्विक स्वरूपाचे आणि त्यानुसार आचरण कसे करावे याचे विवेचन आलेले आहे. तात्त्विक स्वरूपाचे विश्लेषण करताना त्यांनी पाश्चात्य नीतितत्त्वांचे मूल्यमापन करून भारतीयांचे नीतिविवेचन कसे युक्तिसिद्ध आहे हे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे शिक्षणासंबंधीचे मूलभूत विचार संप्रदायसुरतरू, साधुबोध आणि पत्रे यात अनेक ठिकाणी मांडलेले आहेत. सुधारणा म्हणजे काय व तिचे खरे स्वरूप कसे असावे? यासंबंधीच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन भारतीय संस्कृतीच्या सिद्धान्तांना न सोडता सुधारणा कशा करून घ्याव्या, याचे विवेचन केलेले आहे. तसेच आजच्या लोकशाहीच्या काळात ज्या बहुमताला नगदी नाण्याचे मूल्य आहे त्या चलनी नाण्याच्या गुणदोषांचे अगदी थोडक्यात पण मुद्देसूद विवेचन महाराजांच्या युक्तिबद्ध भाषेतून समजून घेताना नावीन्य वाटते.

## पाश्चात्य व भारतीय नीतिशास्त्रांची तुलना

पाश्चात्यांनी बराच अभ्यास करून नीतिशास्त्राची विस्तारपूर्वक मांडणी केली आहे पण त्यांचे निष्कर्ष भारतीयांशी जुळत नाहीत. आर्यावर्ताध्ये नीतीचा विचार केवळ भौतिक सुखप्राप्तीसाठी कधीही केला गेलेला नाही. भौतिक विषयसुखप्राप्ती आणि पारलौकिक सुखप्राप्ती या दोहोंना पूरक होईल अशीच नीती भारतीयांनी स्वीकारली आहे. त्यामुळे धर्म आणि नीती परस्पर सलोख्याने मनुष्याच्या सर्वांगीण विकासात सहभागी होताना दिसतात. त्यांना एकमेकापासून अगदी भिन्न करून नीतीचा स्वतंत्र विचार होऊ शकत नाही असे महाराजांचे स्पष्ट प्रतिपादन आहे.

आपल्याकडे धर्म, अर्थ काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ प्रत्येक मनुष्याचे प्राप्तव्य आहेत. यापैकी मोक्ष पुरुषार्थ हा पूर्णपणे स्वतंत्र आणि सर्वश्रेष्ठ आहे. **यदहरेव विरजेत् तदहरेव प्रवजेत् ।** ज्यादिवशी तीव्र वैराग्य होईल. त्याच दिवशी संन्यास घ्यावा असे श्रुतीने स्पष्ट सांगितले आहे. तीव्र मुमुक्षा आणि वैराग्य उत्पन्न झाल्यानंतर धर्म, अर्थ, काम या तिघांकडे पाठ फिरवून मोक्षप्राप्ती करून घ्यावी. समाजाची किंवा कुटुंबाची वगैरे मुळीच काळजी करू नये असा वेदान्ताशास्त्रातील 'विधी' असल्यामुळे मोक्षपुरुषार्थ या तिहींच्या व्यतिरिक्त स्वतंत्रपणे राहू शकतो, असे दिसते. पण याचा अधिकारी अत्यंत विरळा असतो. तीव्र मुमुक्षा आणि तीव्र वैराग्य होईपर्यंत धर्माच्या चौकटीत असून, अर्थ-कामांचे परिमित सेवन करून, हळूहळू झेपेल तसा मोक्षप्रयत्न करावा असा सर्वसाधारण लोकांसाठी



महत्वाचा नियम आहे. आत्मज्ञान झाल्यानंतर ज्ञानी पुरुषाने समाजाच्या उद्धारासाठी धर्माने आणि नीतीने वागून स्वतःचा आदर्श लोकसंग्रहार्थ घालून द्यावा म्हणजे सोन्याहून पिवळे!

अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थ केवळ इहलोकातील सुखप्राप्तीसाठी महत्वाचे मानले गेले आहेत. हे जर मनुष्याला योग्य प्रमाणात मिळालेनाहीत तर त्याला धर्म आणि मोक्ष देखील प्राप्त करून घेणे कठीण जाते. त्याचे सर्व लक्ष काम आणि अर्थात लागून राहिल्याने धर्माचरणाचे शारीरिक कष्ट आणि मोक्षप्राप्तीसाठी वैराग्यादि आंतर् कष्ट तो सहन करू शकत नाही, म्हणून इहलोकातील अर्थ व काम या पुरुषार्थांना महत्व मिळाले आहे.यांच्या प्राप्तीसाठीच नीतीची आवश्यकता आहे. पण ती नीती देखील धर्माला विरोधी नसावी असे बंधन आहे.

### ''धर्मऽविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ''–गीता ७-११

धर्माच्या विरुद्ध नसलेला काम पुरुषार्थ म्हणजे मी, असे भगवंताने गीतेत सांगितले आहे. याप्रमाणे धर्माच्या मर्यादेत राहून आणि मोक्ष हे ध्येय ठेवून अर्थ आणि काम मिळवावे अशी आर्यांची दृष्टी आहे. पण अशा प्रकारचे कोणतेही बंधन पाश्चात्य नीतिवेत्त्यांनी मानल्याचे दिसून येत नाही. भौतिक सुखासाठी आणि सामाजिक व्यवस्थेसाठीच नीतीचे अवलंबन करावे असे त्यांनी मानलेले आहे. त्यांनी नीतीच्या तीन-चार पायऱ्या केलेल्या आहेत. त्यांची महाराजांनी भारतीय नीतिशास्त्राशी तुलना करून पाश्चात्यांच्या विचारातील अपूर्णतेवर नेमके बोट ठेवले आहे.

नीतीच्या विचारांमध्ये विकास झालेला आहे आणि तो तसाच पुढेही होत राहणार असे पाश्चात्य नीतिवेत्ते म्हणतात. ॲथॉरिटी, इंट्यूशन आणि बहूपयोगिता या तीन गोष्टी एकामागून एक विकसित झाल्या आहेत असे त्यांचे म्हणणे आहे.

### १) ॲथॉरिटी : आप्तवचन

ईश्वरांने किंवा महापुरुषांनी सांगितलेल्या आज्ञा पालन करणे असे ॲथॉरिटीचे स्वरूप असते. प्लेटो वगैरेंच्या ग्रंथांत हाच आप्त वचनप्रामाण्याचा विचार प्रामुख्याने मांडला गेला आहे. चांगल्या मनुष्याच्या मनात चांगलेच विचार असतात म्हणून त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागावे असा याचा आशय आहे.

आपल्याकडे जैमिनींनी धर्माची '**चोदनालक्षणोऽर्थो धर्मः**' - धर्म हा आज्ञारूप असतो अशी व्याख्या केलेली आहे. याप्रमाणे पाश्चात्यांचे नीतीचे लक्षण आपल्या ''धर्मामधे'' अन्तर्भूत आहे. आर्यांना नवीन असे यात काहीही नाही, ख्रिश्चन, मुसलमान वगैरे जगातील सर्वच धर्मात हे आज्ञारूप धर्माचे स्वरूप सारखेच प्रमाणभूत मानले जाते. आपल्याकडे आप्तवाक्याचे आणि वैदिक वाक्यांचे प्रमाण अत्यंत पूर्वीपासून तसेच कायम आहे.

**महाजनो येन गतः स एव पंथाः ॥**
**यद्यदाचरति श्रेष्टस्तत्तदेवेतरो जनः।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥गीता॥**

आप्तवाक्याचे तत्त्व भारतीयांनी सर्वश्रेष्ठ ठरविले आहे तर पाश्चात्यांनी हेच तत्त्व जंगली, प्राथमिक आणि अज्ञानी अवस्थेतील ठरविले आहे. हा मात्र दोघांच्या विचारसरणीतील मोठा फरक आहे.

## २) इंट्यूशन : सदसद्विवेक बुद्धी

ॲथॉरिटी प्रमाणे वागून माणसाची बुद्धी प्रगत झाली की चांगले कोणते व वाईट कोणते हे समजू लागते, तिलाच ''काँशस'' म्हणतात. हीच आपल्याकडील सदसद्विवेकबुद्धी होय. ही बुद्धी जे कर्म चांगले म्हणेल ते करावे असे मार्टिन्यू वगैरे पाश्चात्यांचे मत आहे. आपल्याकडून होणारी वाईट कामे या विवेकबुद्धीचे न ऐकल्याने होतात. त्याचप्रमाणे जेथे संशय असेल तेथे आपली अन्तःकरणाची सत्प्रवृत्ती प्रमाण धरून चालावे असे आपल्याकडील कालिदासानेही म्हटले आहे.

**असंशयं क्षत्रपरिग्रहक्षमा यदार्यमस्यामभिलाषि मे मनः।**
**सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ॥शाकुंतल ॥**

संशयाच्या ठिकाणी सत्पुरुषांची मनोवृत्ती जिकडे धावेल तेच प्रमाण समजावे, असा याचा भावार्थ आहे. यातील 'सताम्' हे पद महत्वाचे आहे.[२] आपले मन साधारणपणे जशी आसक्ती असेल त्याप्रमाणेच धावते. ते नेहमी सत्याकडे धावेलच असे नाही म्हणून सज्जनांची मनोवृत्ती हाच अर्थ येथे अभिप्रेत आहे.

ज्याने भूतकाळात कधीही कोणाचेही अहित केले नाही व जो पुढेही करणार नाही अशा सज्जनाचीच सदसद्विवेकबुद्धी सत्याचा म्हणजे नीतीचा निर्णय करणारी असते. असेच आर्यांनी मानले आहे. म्हणून सत्पुरुषांनी आपल्या इंट्यूशन प्रमाणे चालावे व इतरांनी त्यांच्या आज्ञेप्रमाणे चालावे असे ठरते. म्हणून याचा समावेश भारतीयांनी धर्मामध्येच केला आहे.

पाश्चात्यांप्रमाणे ही इंट्यूशन प्रत्येक व्यक्तीची स्वतःचीच धरली तर मात्र तो धर्म होत नाही. कारण चोराला चोरी करण्याची इंट्यूशन असते तर सज्जनाला चोरी न करण्याची इंट्यूशन असते. असा सर्वच घोटाळा होऊन बसतो. याच्या पुढील विकसित आणि याहून श्रेष्ठ तत्त्व युटिलिटीचे आहे असे पाश्चात्य मानतात.

## ३) युटिलिटी - बहूपयोगिता

'पुष्कळांचे ज्या रीतीने कल्याण होईल'' ती नीती पाश्चात्यांनी वरच्या श्रेणीची मानली आहे. पण या पुष्कळांच्या कल्याणात व्यावहारिक भौतिक सुख हेच अभिप्रेत आहे. हेगेल व आपल्याकडील चार्वाकादि देखील याच मताचे आहेत. हा





बहूपयोगितेचा विचार प्राचीन वाङ्मयात देखील चांगल्या रीतीने व्यक्त झाला आहे पण त्यात परमार्थालाही गोवले आहे हे मात्र महत्वाचे आहे.

**त्यजेदेकं कुलस्यार्थे, आत्मार्थे कुलं त्यजेत् ।**
**ग्रामं त्यजेज्जनपदार्थे, आत्मार्थे जगत् त्यजत् ॥महाभारत.**

कुलाचे कल्याण होत असेल तर एका व्यक्तीचा त्याग करावा. ग्रामाच्या हितासाठी कुलाचा त्याग करावा, आणि देशासाठी गावाचा त्याग करावा असे हे तीन त्याग बहूपयोगितारूपी नीतीत अन्तर्भूत होतात. आणि आत्मप्राप्ती होत असेल तर साऱ्या जगाचा त्याग करावा असा हा चवथा त्याग मात्र शुद्ध परमार्थात अन्तर्भूत होतो.

याप्रमाणे नीतीचे तिन्ही प्रकार आर्यधर्मात अंतर्भूत आहेत हे स्पष्ट दिसून येते. यांचा परमार्थाशी समन्वय केला म्हणजे पाश्चात्यांच्या नीतिशास्त्रातील भौतिकतेचे अनायासे खंडन होते.

ॲनी बेझंट या थियासॉफिस्ट स्त्रीने इव्होल्यूशनथियरीप्रमाणे वरील तिन्ही प्रकारांचा विचार मांडला आहे[३] पण तसे केल्यामुळे हिंदू पद्धतीवर कसा आघात होतो ते महाराजांनी दाखवून देऊन नंतर त्याचे व्यवस्थित खंडन केले आहे. [४] ते थोडक्यात पाहू-

१) मनुष्य अज्ञानी आहे तोपर्यंत कोणाची तरी आज्ञा पालन करणे आवश्यक आहे. मग ती आज्ञा ईश्वराची असो की महापुरुषाची असो! हीच ॲथॉरिटी होय.

२) त्यानंतर व्यक्तित्वाचा विकास झाला की तो मनुष्य सदसद्विवेकाच्या साह्याने चांगल्या वाईटाचा निर्णय घेऊ लागतो. ही इंट्यूशन होय.

३) पण या दोहीपेक्षा बहूपयोगिता श्रेष्ठ आहे. कारण त्याने साऱ्या समाजाचे हित साधले जाते. व्यक्तीपेक्षा समाज मोठा आहे. याचा अर्थ एखादी व्यक्ती चांगली असली तरी देखील तिचा समाजाच्या हिताकरता त्याग करणे याच युटिलिटी तत्त्वाप्रमाणे आवश्यक ठरते.

पाश्चात्य नीतीतील बहूपयोगिता श्रेष्ठ ठरविल्यानंतर एका सद्गुणसंपन्न सज्जन व्यक्तीपेक्षा दुर्गुणांनी युक्त असलेल्या समाजाला अधिक महत्व मिळते. बहू लोकांशी विरोध आला तर सद्गुणी व गरीब माणसांना या नीतिद्वारा न्याय मिळण्याचा सुतराम संभव नाही. कारण समाजात चांगल्या सद्गुणी आणि बुद्धिमान माणसांचे प्रमाण अत्यल्प असते. म्हणूनच बहूपयोगिता याचा अर्थ पाश्चात्यांप्रमाणे पुष्कळांचे भौतिक सुख असा केला म्हणजे सद्गुणींची किंमत नाहीशी होते. आणि थोडे लोक कितीही चांगले असले तरी पाश्चात्य नीतीप्रमाणे त्यांना न्याय मिळणे कधीही शक्य नसते.

## हिंदूंवर धाड

पाश्चात्यांनी आज्ञापालन, सदसद्विवेक व बहूपयोगिता याप्रमाणे नीतितत्त्वांची उत्क्रांती मानली आहे. ॲनी बेझंटप्रमाणे तर हे जगत सतत उत्क्रांतच होत राहणार; असे असल्याने 'नीतीची तत्त्वे स्थिर नसून सतत बदलत राहणार' असा निष्कर्ष निघतो. या निष्कर्षाने नीतीची अगदी अनवस्था करून टाकली आहे. दुसरे असे की नीतीचा असा विकास मान्य केला की हिंदूंवर धाड येते.

ती कशी ते पाहू- हिंदुधर्मात वेदप्रामाण्य सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. म्हणून वेदानुसार आणि तदनुसार असलेल्या पुराण, स्मृती वगैरे धर्मग्रंथांप्रमाणे आचरण ठेवावे असा धर्मशास्त्राचा नियम आहे. ॲनी बेझंटचा विकासवाद मान्य केला की खालील निर्णय घ्यावा लागतो.

हिंदूंना स्वतंत्र विचार करण्याची योग्यता नाही कारण ते वेदांवर विश्वास ठेवतात. अज्ञानी आहे तोपर्यंत ॲथॉरिटीवर विश्वास ठेवावा असे ग्राह्य केले म्हणजे आपोआप हिंदू लोकअज्ञानी व रानटी आहेत असे ठरते. [५] म्हणून बेझंटबाईच्या या मांडणीत तिचा खरा उद्देश कोणता याबद्दलच संशय येतो.

**विकासवादाचे खंडण : परिवर्तन वाद योग्य**

या सृष्टीत सारखी उत्क्रांतीच होत आहे असे मानता येत नाही. कारण उत्क्रांती प्रमाणे अपक्रांतीही होत असते. म्हणून विकासवादापेक्षा परिवर्तनवाद मानणे हेच अधिक सयुक्तिक आहे.

वानराची उत्क्रांती होऊन मनुष्य झाला. यात वानराचे काही गुण मनुष्यात विकसित झालेले दिसतात पण विषपरीक्षा, शीतोष्णादि सहन करण्याची शारीरिक शक्ती वगैरे अनेक गुण नाहीसेही झालेले आहेत म्हणून या बदलाला केवळ उत्क्रांतिपेक्षा परिवर्तन म्हणणे योग्य होईल.

त्याचप्रमाणे बीजाचा अंकुर होणे, त्यापासून वृक्ष नंतर फळ आणि पुनः बीज तयार होणे या प्रक्रियेमध्ये बीजापासून फळापर्यंत विकास दिसतो. पण नंतर पुनः बीज उत्पन्न झाले की पुनः तीच स्थिती आली म्हणून चक्राकार परिवर्तन मानणे हे देखील इष्ट होईल उत्क्रांति नव्हे

उदा. एका राष्ट्राची उत्क्रांति होते तर एका राष्ट्राची अपक्रांती होते. महायुद्धापूर्वी इंग्लंड विकसित राष्ट्र म्हणून प्रसिद्ध होते तर उलट आज महायुद्धात हारलेल्या जपान राष्ट्राने सर्व जगाला आर्थिक नीतीत हारविले आहे. पूर्वी रोम साम्राज्य श्रेष्ठ होते तर आज त्याचा मागमूसही नाही.

उत्क्रांतीचेच तत्त्व स्वीकारल्यास पुरुषाची बुद्धी स्त्रीपेक्षा अधिक दिसते म्हणून पुरुष आधी उत्पन्न झाला असला पाहिजे असे अनुमान काढले तर कसे होईल! म्हणून उत्क्रांती व अपक्रांती दोन्ही मानाव्या लागतात. हेच आपल्याकडील 'चक्रपरिवर्तन' होय. (महाराजांनी समयोपदेश, अलौकिक व्याख्यानमाला आणि पत्रव्यवहार या ग्रंथात अनेकठिकाणी डार्विनच्या उत्क्रांतिवादाचे सविस्तर खंडन





केले आहे. तो विषय या प्रबंधात दुसरीकडे आला आहे.)

## ईश्वर नीतीचा पुतळा होऊ शकते काय?

पाश्चात्य विचारवंतात आस्तिक आणि नास्तिक दोघेंही आहेत त्यापैकी असलेले थिऑलॉजिन लोक ईश्वराला नीतीचा पुतळा मानतात. या विचाराचे महाराजांनी केलेले मूल्यमापन महत्वाचे आहे. त्यांनी ॲथॉरिटी, इंट्यूशन, युटिलिटी व इव्होल्यूशन या चारी कल्पनेप्रमाणे परमेश्वराला नीतीचा पुतळा ठरविणे अशक्य आहे हे समर्थ युक्तिवादांनी पटवून दिले आहे.

१) परमेश्वर कोणत्या तरी ॲथॉरिटीप्रमाणे वागतो असे म्हटले तर त्याहून श्रेष्ठ असा दुसरा ईश्वर मानावा लागेल व त्याच्या ॲथॉरिटीसाठी पुनः तिसरा, मग चौथा अशी ईश्वरांची परंपराच मानावी लागेल ही अनवस्था होईल, म्हणून पहिल्या तत्त्वाप्रमाणे ईश्वर नीतीचा पुतळा होऊ शकत नाही.

२) इंट्यूशनप्रमाणे ईश्वर वागतो म्हटले तर त्याला फक्त चांगले कॉंशस आहे असे म्हणावे लागते. मग ईश्वराला सैतान उत्पन्न करण्याची बुद्धी कशी झाली हे कळत नाही. सत् आणि असत् यांचा विवेक करण्याची शक्ती त्याचे ठिकाणी मानली तरी सृष्टीच्या उत्पत्तिकाली त्याने असत् उत्पन्नच कां केले, याचा उलगडा होत नाही. असा असद्बुद्धीला किंवा सैतानाला उत्पन्न करणारा ईश्वर नीतीचा पुतळा होऊ शकत नाही.

३) युटिलिटी प्रमाणे चालतो, असे म्हटले तर थोडे लोक कितीही चांगले असले तरी परमेश्वराच्या कोर्टात त्यांची दाद लागणे कधीच शक्य नाही. कारण ईश्वर पुष्कळांचे पुष्कळ सुख पाहील. व्यक्तिगत सुखाकडे लक्षच देणार नाही. मग सद्गुण वगैरेसर्वच व्यर्थ होऊन नीतीचे कंबरडेच मोडेल.

४) ईव्होल्यूशन प्रमाणे तर परमेश्वराचे अस्तित्त्वच सिद्ध नाही. पुढे केव्हा तरी जगातील सर्व यच्चयावत् जीव उत्क्रांतीच्या शेवटाला पोहोचतील तेव्हा कुठे ईश्वराची घटना होणार! पण त्यावेळी सर्वच जण पूर्ण उत्क्रांत झालेले असल्यामुळे ईश्वराची आवश्कताही राहणार नाही. सर्वच ईश्वर होतील. बरे ही उत्क्रांती बेझंटमताप्रमाणे कधीही पूर्णहोणारी नसली तर ईश्वरही कधी उत्पन्न होणे शक्य नाही.

५) आर्यधर्माप्रमाणे धर्म आणि नीतीचा समावेश योगाच्या यम नावाच्या अंगात झाला आहे. यमापैकी अहिंसा हीच एक घेतली तरी ती ईश्वराचे ठिकाणी पूर्णरूपाने राहणे शक्य नाही. योगशास्त्राप्रमाणे विचार केला असता ज्याला अहिंसा साधली आहे अशा योग्याच्या सभोवतालच्या परिसरात व्याघ्र, सर्प, गाई वगैरे सर्व प्रणिमात्र आपले स्वाभाविक वैर विरून गुण्यागोविंदाने राहतात.

परमेश्वर अहिंसेचा पुतळा आहे म्हटले तर तो व्यापक असल्यामुळे त्याने निर्माण केलेल्या सृष्टीत नकुलसर्पादिक परस्पर स्वाभाविक वैर असलेले प्राणी उत्पन्न होऊ नयेत. पण तसे दिसत नाही.

दया आणि न्याय हे गुण परस्पर विरुद्ध आहेत, ते देखील एकाच परमेश्वराच्या ठिकाणी एकत्र राहू शकत नाहीत. म्हणून भारतीय दृष्टीने देखील परमेश्वर नीतीचा पुतळा होऊ शकत नाही.

## धर्म व नीती

वर वर पाहता, उत्क्रांतीचे तत्त्व नीतिशास्त्राला लागू होते असे वाटले तरी ते बरोबर नाही असेआपण पाहिले. इव्होल्यूशनपेक्षा रिव्होल्यूशनचेच तत्त्व सृष्टीला लागू होते. म्हणून शेवटी हिंदू विचार पद्धतीच्या साह्याने नीतिविचार करणे आवश्यक आहे.

हिंदूंच्या दृष्टीने धर्म आणि नीती यांचा फारच निकटचा संबंध आहे. सकृत्दर्शनी तर असे भासते की हिंदूंनी नीतीला धर्मातच अन्तर्भूत करून घेतले आहे. पण वस्तुतः तसे कांटेकोरपणे म्हणता येत नाही.

**धर्मे अन्तर्भावयेत् नीतिम् नीत्यां धर्मे विपद्यदि ॥ स्वमतनिर्णय.**

नेहमी धर्मानुसार नीतीचे आचरण करावे, धर्मानुसार चालणे म्हणजेच नीती समजावी, पण आपत्काल असेल म्हणजे धर्मपालन करणे अशक्य असेल, तेव्हा मात्र केवळ नीतीप्रमाणे चालावे व धर्माचा अन्तर्भाव नीतीत करावा, असे महाराज सूत्ररूपाने सांगतात. याप्रमाणे नीतीचा व धर्माचा सूक्ष्म भेद आहे.

## नीती म्हणजे काय?

आपल्याला दुःख नको असते तसे सर्वांनाचा दुःख नको असते.म्हणून ज्या रीतीने सर्वांचे दुःख दूर करता येईल असे आचरण नीतीचे समजावे. परिणामी ज्यामुळे दुःख उत्पन्न होत नाही असे आचरणही नीतीत मोडते, असे महाराज म्हणतात.

ही नीती इहलोकापुरतीच मर्यादित असली, म्हणजे शरीर आहे तोपर्यंत दुःखपरिणामी आचरण होऊ नये इतकाच नीतीचा संकोच असला, तर तिच्यातून सामाजिक नीती, राजनीती, कुटिलनीती वगैरे भेद पडतात तसेच बहूपयोगितादि वादही या इहलोकीच्या नीतीतच मांडले जातात.



परिणाम या शब्दाचा अर्थ मेल्यावर देखील आपल्याला दुःख होऊ नये, असा घेतला तर मात्र इहलोकात व परलोकात सुख मिळवून देणारे आचरण म्हणजे नीती असे मानावे लागते. या आचारधर्मालाच धर्म म्हटले गेले आहे. पुनर्जन्म व देहरहित सुख हे परलोक या शब्दाचे अर्थ समजावे.

याप्रमाणे इहलोक व परलोकाच्या दृष्टीने पाहिले असता नीतिशास्त्राप्रमाणे धर्म, अर्थ. काम व मोक्ष या चारी पुरुषार्थाची संगती लावता येते. तसेच मूळ धर्मावरच तिन्ही पुरुषार्थ अधिष्ठित आहेत असेही दाखविता येते. प्रवृत्तिलक्षण धर्म, निवृत्तिलक्षण धर्म अधर्म यांचा विचार केला की हे स्पष्ट होईल.

## १) प्रवृत्तिलक्षण धर्म

प्रवृत्तिलक्षण धर्माने अर्थ व काम प्राप्त करून घ्यावे. मनुष्याने आपल्या धर्माचे पालन सकामबुद्धीने केले असता जिवंतपणी आयुरारोग्यधनसंपत्ती वगैरे मिळतात, मनःशांती मिळते आणि मेल्यानंतर स्वर्गादि उत्तम लोकांची प्राप्ती होते किंवा पुढील जन्मी उत्तम कुलात जन्म होऊन सर्व लौकिक सुखे जीवाला मिळतात.

**यतोऽभ्युदय-निःश्रेयस सिद्धिः सः धर्मः॥२॥**

असे धर्माचे लक्षणच कणादाचार्यांनी केलेले आहे. अभ्युदय शब्दाने लौकिक व पारलौकिक सुखे अभिप्रेत आहेत आणि निश्रेयस म्हणजे मोक्ष होय. याप्रमाणे अर्थ आणि काम सकाम धर्माचरणाने जीवाला प्राप्त होतात.

## २) निवृत्तिलक्षण धर्म

निवृत्तिलक्षण धर्माने मोक्ष मिळवावा. वैदिक आणि पुराणोक्तकर्माची फळे मला नकोत, कर्तव्य म्हणून मी धर्माचरण करणार. या भावनेने धर्म पाळला असता चित्तशुद्धी होऊन मोक्ष मिळतो.

## ३) अधर्म

धर्माच्या विरुद्ध वागले असता नरकप्राप्ती होते आणि जीवाला अनेक जन्मात अनेक दुःखे भोगावी लागतात. म्हणजे परमेश्वराचा नियम मोडल्याबद्दल शिक्षा होते. म्हणून अधर्म केव्हाही त्याज्यच आहे.

याप्रमाणे धर्मपुरुषार्थावरच अर्थ, काम व मोक्ष अवलंबून आहेत, हे आपण पाहिले. तरीपण रोजच्या जीवनातील अनेक गोष्टी धर्माच्या कक्षेत येत नाहीत. पैसा मिळविणे, घर बांधणे, पैसा राखणे, त्याचा योग्य व्यय करणे, उपभोग घेणे किंवा व्यवहारात इतर लोकांशी बोलणे, चालणे, वागणे वगैरे बरेच ठिकाणी 'कसे वागावे' यासंबंधी धर्मात नियम सांगितलेले नसतात. त्यावेळी मात्र नीतिशास्त्र प्रवृत्त होते. ''आपल्या आचरणामुळे इतरांना दुःख न होता सुखच होईल अशी प्रवृत्ती ठेवून व्यवहार करणे,'' हे नीतीचे मूळ सूत्र आहे.

''विधायम धर्माज्ञेला फारसे चिकटून न राहता आणि निषेधात्मक धर्माज्ञेने उल्लंघन न करता, धर्म जेथे उदासीन असेल अशा ठिकाणी स्वप्रयत्नाने अर्थ व काम साध्य करून घेणे याला शास्त्रावेत्ते नीती म्हणतात.''

१) आचरण विहित-धर्माज्ञेला अधिक चिकटून असल्यास सन्नीती होते व

२) निषेधात्मक धर्माज्ञेला अधिक चिकटून असल्यास कुटिलनीती होते.

नीतिशास्त्राने धर्मात ढवळाढवळ करू नये आणि धर्मही नीतीत ढवळाढवळ करण्याची इच्छा करीत नाही. त्यांनी परस्पर तडजोडच करावी, असा संकेत आहे. यांचा परस्पर संबंध ''स्वपरनेत्रनिरीक्षणवत् साक्षिभास्यभाव'' आहे, असे महाराज म्हणतात.

## आर्यसंस्कृतीत नीतीचे स्थान

ब्रह्मसमाज आणि आर्यसमाजांनी सामान्य रूढ नीतीला श्रेष्ठ ठरवून हिंदू धर्मावर टीका केलेली आहे. परंतु कोणत्याही धर्माकडे निःपक्षपातीपणाने पाहिले तर रूढ नीतीला विरोधी वाटणारे प्रकार असतातच परंतु सखोल दृष्टीने पाहिल्यास ते शुद्ध नीतीला सोडून नाहीत व त्याचा परिणाम चांगलाच झाला आहे असे कळून येते. या बाबतीत अनीतीने वागणाऱ्या त्या व्यक्ती रागद्वेषरहित आहेत की नाहीत, किंवा त्या कार्याचा परिणाम हितकारक झाला की नाही याच गोष्टीला महत्व दिले गेले आहे. आपल्या धर्माच्या इतिहासात तर अवतारादिकांच्या आचरणात अशी अनेक उदाहरणे आढळतात.

रामायणात रामाने वालीला पाठीमागून मारले हे अनीतीचे कृत्य केले, पण त्याचाच सर्वश्रेष्ठ म्हणून गौरव केलेला दिसतो. उलट भरताने कोणतेही अनीतीचे काम केलेनाही पण त्याचे स्थान रामायणात गौणच आहे.

भागवतात वर्णिलेला मैथिल ब्राह्मण अत्यंत नीतिमान आहे. पण नास्तिक लोक ज्यावर अनीतीचा आरोप करतात अशा श्रीकृष्णालाच भागवतकारांनी सर्वोच्च मान दिला आहे.

महाभारतात तर याहून विलक्षण आहे. अनेक वेळा भारत वाचले तरी अत्यंत नीतिमान कोण, हे लक्षात येणे कठीण आहे. विकर्ण आणि भूरिश्रवा हे दोघे नीतिमान दिसतात. विकर्णाने द्रौपदीवस्त्रहरणाचे वेळी निषेध केला. भीष्मादिकांनी जी नीतिमत्ता दाखविली नाही ती विकर्णाने दाखविली. पण त्याला भारतात अग्रस्थान मुळीच मिळालेले नाही.

यावरून भारतीय संस्कृतीत नीतिशास्त्राचा सूक्ष्म व सखोल विचार केलेला आहे असे दिसेल. म्हणूनच साधकाला नीतिनियमांचे काटेकोर पालन आवश्यक मानले असले तरी महापुरुषांच्या आचरणाला नीतिनियम अत्यंत कडक रीतीने लागू केलेले नाहीत.



''साधकावाचून महापुरुषांना नीतिदृष्टीने पाहणे हिंदुधर्मास विशेषसे संमत नाही''[८] या महाराजांच्या वाक्याचा आशयही असाच आहे. महापुरुषांच्या सकृत्दर्शनी अनीतीच्या कृत्यात रागद्वेषांचा किती अंश आहे व लोकांच्या हित करण्याचा किती अंश आहे हे कसून पाहण्याची आज्ञा हिंदुधर्माने सरसकट देऊन ठेवली आहे. रागद्वेषादि विकारांनी अनीतीचे कृत्य घडले असेल तर त्यांची निंदाच केली गेली आहे. रागद्वेष असोत की अनीती असो, ती जर आहार्य म्हणजे ''मुद्दाम एखाद्या चांगल्या कार्याकरता स्वीकारलेली'' नसली तर तिच्यापासून होणारे पाप व नरकप्राप्ती वगैरे अनर्थ टळू शकत नाही, असे महाराजांनी सोदाहरण दाखवून दिले आहे.

आहार्य अनीतिमानांना त्याचे फळ भोगण्याचेही काही विशेष वाटत नाही. भारतात 'नरो वा कुंजरो वा' असे खोटे बोलून युधिष्ठिराने द्रोणाचार्यांचा वध केला. आणि त्याची फळे, रथाची चाके जमिनीवर येणे व स्वर्गारोहण करताना अंगठा गळून पडणे, वगैरे सहन केलीत. त्याने असा विचार केला की द्रोण जिवंत राहिले तर कौरवांचे दुष्ट राज्य कायम राहील त्यामुळे प्रजेची पीडा कमी होणार नाही त्यापेक्षा आपण दुःख भोगावे व प्रजेला सुखी करावे. म्हणून त्याने आहार्य अनीती स्वीकारली आणि तिचे फळही भोगले. ही जाणून बुजून केलेली अनीती असल्यामुळे त्याला भारतकारांनी फारसा दोष दिलेला नाही.

## योगआणि नीती

नीती म्हणजे स्वभावनियम आणि नीती म्हणजे आचारनियम असे बहुतांशी म्हणता येते. योगामध्ये धर्म आणि मिळूनच अष्टांगे. घेतली आहेत. अहिंसा, सत्य, अचौर्य, आर्जव, क्षमा, धृती, शौच, ब्रह्मचर्य, मिताहार व दया; ह्यामुळे बाह्य आचारांचे नियमन होते तसा मनाचा स्वभाव देखील सुधारतो. हा व्यक्तिगत फायदा असून व्यवहारात इतर लोकंच्या सुखदुःखांकडे सहृदयतेने पाहून त्यांच्या कल्याणाचा प्रयत्न केला जाणे, हा सामाजिक फायदा आहे.

धर्माचे नियम पालन केले असता मनुष्याचा सत्त्वगुण वाढतो आणि त्या सत्त्वगुणामुळे धर्म पालन करणारा सर्व समाज सत्त्वसंपन्न होतो. त्यामुळे समाजातील अन्तर्गत व्यवस्था कलहाशिवाय टिकून राहते. सर्वांनी धर्माचरण केले तर लौकिक सुख आणि पारलौकिक सुख समाजाला मिळू शकते आणि व्यवहारातही समाधान, स्थैर्य वगैरे प्राप्त होते.

**सत्त्ववृद्धिर्भवेद् येन अन्यगुणद्वयघातिनी ।**
**स हि धर्मो न चान्यः स्यादिति स्वमतनिर्णयः॥५॥**
**स्वधर्मे परधर्मे वा यत्सत्त्वफलसाधकम्**

## तत्तदरतु परं धर्म्यमिति स्वमतनिर्णयः ॥७॥

याप्रमाणे सत्ववृद्धी करणारा आचार धर्म म्हणून योगशास्त्रात आणि व्यवहारात दोन्ही ठिकाणी आचरणीय आहे. नीती आणि धर्म योगशास्त्राच्या यमरूपी प्राथमिक अंगात समाविष्ट असल्यामुळे साधकाने नीतीच्या सर्व अंगांचा अभ्यास एकदम केला पाहिजे. नाहीतर एकच गुण वाढून दुसऱ्या अंगात अनीतीचा जोर वाढू शकतो. जसे, कर्णाने औदार्यात खूप प्रगती केली पण इतरत्र त्याची अनीती सुटली नाही. युधिष्ठिराचे ठिकाणी सत्यवचन हा गुण वाढला पण भीरुता वगैरे काही दोष राहिले. म्हणून व्यक्तीने नीतीच्या सर्व अंगांचाअभ्यास साकल्याने करावयास हवा असे महाराज म्हणतात.

केवळ नीतीच्या दृष्टीने साधक श्रेष्ठ आहे की कनिष्ठ आहे हे पाहणे आपल्याकडे फारसे संमत नाही. व्यक्ती साधक असेल तर सामाजिक बहूपयोगितेचे तत्व त्याचे ठिकाणी लागू करण्याचे कारण नाही. कधी कधी तो अनीतीने वागला तरी ते गर्हणीय होत नाही.**देव जोडे तरी करावा अधर्म ॥** असे तुकाराम महाराज म्हणतात. कबीरपुत्र कमालाने चोरी करून संतकृपा प्राप्त केली आणि परमेश्वरप्राप्तीही करून घेतली. संन्यास ग्रहण करताना तर कुटुंबाच्या दृष्टीनेअत्यंत दुःखदायक वर्तन करावे लागते. परमार्थाच्या प्राप्तीसाठी कुटुंबाकडे व साऱ्या समाजाकडे पाठ फिरवून आपली प्रगती करावयाची असते त्यामुळे ते आचरण बहूपयोगितेत न बसले तरी त्याने अधर्म किंवा अनीती घडत नाही असे हिंदुधर्माचे स्पष्ट मत आहे.

लो. टिळक गीता रहस्यात म्हणतात ''समाजधारणा हाच धर्माचा मुख्य बाह्य उपयोग आहे हे तत्व जरी आम्हास कबूल आहे तरी वैदिक किंवा इतर सर्व धर्मातील परमसाध्य जे आत्मकल्याण किंवा मोक्ष त्यावरची आमची दृष्टी आम्ही कधीही चळूं देत नाही. हा इतरांपेक्षा आमच्या मतातला विशेष आहे. समाजधारणा घ्या की सर्वभूतहित घ्या, ही बाह्योपयोगी तत्वे जर आमच्या आत्मकल्याणाच्या मार्गात आड येत असली तर ती आम्हास नकोत.... ते कर्मयोगशास्त्र आध्यात्मिक मोक्षज्ञानाला सोडून आमचे शास्त्रकार सांगतील हे कधीच संभवनीय नाही. म्हणून मोक्षाला म्हणजे आमच्या आध्यात्मिक उन्नतीला अनुकूल जे कर्म ते पुण्य, धर्म किंवा शुभकर्म होय आणि त्याला प्रतिकूल कर्म ते पाप, अधर्मकिंवा अशुभ असे आम्ही समजतो''

## पाश्चात्य आणि भारतीय नीतितत्वांची सांगड

आप्तवचन, सदसद्विवेक बुद्धी, बहूपयोगिता आणि उत्क्रांती या पाश्चात्य नीतीच्या चार प्रकारांचे महाराजांनी सविस्तर खंडन केलेले आपण थोडक्यात पाहिले. पण पाश्चात्यांचेच शब्द वापरून भारतीय नीतिशास्त्र कसे मांडता येते तेही समन्वय दृष्टीने महाराजांनी दाखवून दिले आहे. तेही संक्षेपाने पाहू-



केवळ कुटुंबाचे हित पाहणारा असला तर तो समाजाच्या दृष्टीने टाकाऊ असतो. समाजाकरता झटणारा असला तर तो कुटुंबदृष्टीने वेडा ठरतो आणि समाजदृष्टीने उत्तम असतो. केव्हा केव्हा तर कुटुंबदृष्टीने आणि समाजदृष्टीने वेडा असलेला 'साधक' साधुपुरुषांच्या दृष्टीने उत्तम असतो. म्हणून कोणत्याच नियमान्वये एखाद्याला चांगले किंवा वाईट ठरविता येत नाही. शेवटी ''आपल्याला चांगला वाटला तर चांगला नाहीतर वाईट,'' हाच निकष शिल्लक राहतो.

भारतीय विचार परंपरांचे ध्येय जीवाने स्वतः परमेश्वरस्वरूप होऊन जगताच्या कारणात मिळून जाणे हे असल्यामुळे परमार्थमार्गावरील पथिक हाच डोळ्यासमोर ठेवून धर्म आणि नीति यांचा विचार हिंदूंच्या शास्त्रात केला आहे. सामान्यातल्या सामान्य व्यक्तीची देखील हळू हळू कां होईना आध्यात्मिक प्रगती व्हावी, हा भारतीय धर्म व नीतीचा खरा उद्देश आहे. सामान्य माणूस सतत विकासच पावत असतो असे म्हणणे वस्तुस्थितीच्या विरोधी आहे. विचारांचे साह्य घेतले तर त्याची उन्नती होते आणि विकारांप्रमाणे वाहवत गेला तर अधोगती होते. हे स्पष्ट मांडले गेले आहे. म्हणूनच या सृष्टीतील सर्वांची गती केवळ उत्क्रांती होत राहणे, अशी नसून 'सतत बदल होत राहणे' अशी चक्राकार आहे. गीतेत या सृष्टीला अश्वत्थवृक्षाची उपमा देऊन तिचे अनादि अनंतत्व दाखवून दिले आहे.उर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ॥ अ. १५.१

अशा या अव्यय संसारवृक्षापासून सुटका करून घ्यावयाची असेल तर या सृष्टीच्या बाहेरील शाश्वत तत्वापासूनच स्फूर्ती घेऊन ज्ञान संपादन करणे आवश्यक आहे. शाश्वत तत्त्वापासून स्फुरण पावलेले वेदच आहेत. त्यांच्याच आज्ञेप्रमाणे चालणे व त्यानुसार ज्ञान करून घेणे जरूर आहे. जे महात्मे या सनातन तत्त्वाशी एकरूप झाले आहेत त्यांचा उपदेश देखील वेदानुसारच असल्याने स्मृती पुराणातील उपदेशाप्रमाणे वागणे हे परमार्थ प्राप्तीला साह्यभूतच होते. म्हणून ज्यांना या परमतत्वाची ओळख पटली नाही त्या सर्वांनी ''ॲथॉरिटीने'' चालणेहेच त्यांच्या परम हिताचे आहे.

या ॲथॉरिटीप्रमाणे मनावर संस्कार करून घेतले असता साधक जगत्कारणपर्यंत जाऊन पोचतो. तेव्हा त्याला इंट्यूशनचा अधिकार येतो. जगत्कारणाच्या ॲथॉरिटीप्रमाणे वागून इंट्यूशन प्राप्त झालेले साधकच साधुपुरुष समजले जातात. त्यांच्या इंट्युशनमुळे ॲथॉरिटीला कमीपणा येत नाही. ती नेहमीच श्रेष्ठ असते. त्यानंतर आपल्याला जशी संसारदुःखातून मुक्तता मिळाली व ब्रह्मसुख मिळाले, तेच मुक्तिसुख सर्वांना द्यावे अशी उदात्त इच्छा करून जेव्हा बहुजनहिताय आचरण होते, त्यालाच ''लोकसंग्रह'' हे नाव आहे आणि यालाच पाश्चात्याची ''युटिलिटी'' म्हणता येईल.

**बुडते हे जन न देखवे डोळा ।**
**म्हणोनी कळवळा येतसे ॥१४१०॥**
**तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ॥**

ह्या तुकाराम महाराजांच्या वचनात बहुजनहिताची वृत्ती प्रतिबिंबित आहे.

याप्रमाणे ह्या तिन्ही तत्वांच्या भारतीय मांडणीमुळे असे दिसते की जीवाने प्रयत्न केला की जीवाची इव्होल्यूशन होऊन तो नराचा नारायण होण्याच्या मार्गाला लागतो. महाराजांनी केलेल्या या समन्वयात पाश्चात्य नीतीतील तीन दोष काढून टाकले गेले आहेत. १) भौतिक सुखाची दृष्टी, २) ॲथॉरिटीची गौणता, ३) पतनाशिवाय इव्होल्यूशन.

या तीन दोषांचे अपनयन झाल्यामुळे १) अध्यात्मिक सुखाची दृष्टी २) ईश्वराच्या शब्दाचे परमप्रामाण्य आणि ३) पतनाचेधोके टाळून उत्क्रांतीची प्रयत्न साधकाने करण्याची आवश्यकता, या तीन महत्वाच्या सिद्धांतांचा पुनर्स्थापना भारतीय पद्धतीने महाराजांनी केली आहे याप्रमाणे पाश्चात्यांच्या शब्दात भारतीय नीतिशास्त्र मांडतांना त्यातील ग्राह्यांश घेऊन व त्याज्यांशाचा त्याग करून महाराजांनी दोहोंची घातलेली सांगड लक्षणीय आहे.

## सदाचाराचा उपदेश

महाराजांनी केलेली पाश्चात्य आणि भारतीय नीतिशास्त्रांची तुलना आपण पाहिली. भारतीय विचारवंतांनी धर्म आणि नीती मिळून व्यक्तीची दैनंदिन वागणूक कशी असावी याबद्दल अनेक ठिकाणी उपदेश केलेला आढळतो. संस्कृतमध्ये तर त्याच्या विस्ताराला जणु मार्यादाच नाही. पण संस्कृत कठिण असल्यामुळे समर्थ रामदास, श्री एकनाथ यासारख्या संतांनी मराठीतही सदाचार, मूर्खलक्षण, चातुर्यलक्षण इत्यादि अनेक विषयांवर भरपूर लिखाण केले आहे. त्याचप्रमाणे महाराजांनीही साधुबोध नावाचा जवळजवळ हजार प्रश्नोत्तरांचाएक ग्रंथच लिहिला आहे. संप्रदायसुरतरू या ग्रंथातही सांप्रदायिकांनी कसे वागावे, याचे ओवीबद्ध निरूपण सोपे आणि मार्मिकझाले आहे. पत्रव्यवहारातही साधकानें व्यवहारात कसे वागले असता परमार्थाला विरोध येणार नाही याचे विवेचन आहे. स्त्रियांनी लिहिलेली पत्रे, तसेच खास स्त्रियांकरताच निर्मिलेल्या स्त्रीगीत संग्रहातील पद्यांची रचना ही धर्म आणि नीतीचे स्वरूप सांगणारी असून काव्य दृष्टीनेही वरच्या दर्जाची आहेत. त्या सर्वांचा साकल्याने आढावा घेणे या ठिकाणी पोषक होईल.म्हणून कुटुंबातील व्यक्तींनी परस्पर कसे संबंध ठेवावेत यासंबंधी महाराजांचे विचार पाहू-

## कुटुंब विषयक

जुने न सोडता जो नव्याला जुने करता तो कुलवान. याच्या उलट करणारा कुलघाती. [१०] कुटुंबातील माणसे चांगली नसतील तर परमार्थी साधकाने सर्व घरदार सोडून द्यावे पण जर चांगली असतील तर मात्र संसारापेक्षा संन्यास काही श्रेष्ठ नाही असे मत महाराजांनी व्यक्त केले आहे. [११]

घरातील फूट नाहीशी कशी करावी यासंबंधी रोचक कथानक रचून महाराजांनी व्यवहार समजावून सांगितला आहे.[१२]

**आई-बाप**- व्याधीचे वेळी साह्य करणारा कोणीही आईप्रमाणेच श्रेष्ठ आहे जन्मदाता पित्याप्रमाणे पूज्य आहे. संकटात प्राण वाचवणारा बापापेक्षा श्रेष्ठ व आईच्या तोडीचा आहे पण आई कांकणभर वरच आहे.[१३]

विरोधी ईश्वरभक्तीत अडथळा करतील तरच, आई वडिलांचा सल्ला झुगारता येतो, इतर वेळी कधीही नव्हे. वडील नसतील तर कोणीतरी वृद्धाच्या सल्याने चालावे,अत्यंत स्वतंत्र राहू नये. जन्म देणारे आईबाप कृपणांना श्रेष्ठ वाटतात, तर उदारांना प्रेम करणारे श्रेष्ठ वाटतात. गृहस्थाचे मुख्य कर्तव्य आईबाप व अतिथींची सेवा हेच आहे. कधीही कोणालाही उत्कर्षास येऊ न देणारी भाऊबंदकी आहे. मोठ्यांनी उपेक्षा केली तर तो कोप समजावा. बाप रागावला असता मुलाचा पक्ष आई घेत असेल तर तो उद्धट होतो. गृहछिद्र गुप्त ठेवावे पण नाहीसे करावे, आपल्यालाच लाजविणारे असेल तर प्रगट करावे शत्रूपासून गुप्त ठेवावे व प्रायश्चित्तार्थ वडिलांजवळ प्रगट करावे.

गोड बोलणेव कडू बोलणेयावरून महाराजांनी काढलेलेनिष्कर्ष मनन करण्यासारखे आहेत. त्यांचे मत असे आहे की तोंडावर गुरुजन गोड बोलले तर आपल्याला प्रेम नाही असे समजावे. मागे गोड बोलले तर आपल्यावर प्रसन्न आहेत असे समजावे. वडील समोर कडू बोलले तर ते कल्याण इच्छितात असे समजावे. मित्र तोंडावर गोड बोलले तर काहीच समजू नये. मागे गोड बोलले तर त्यांचे प्रेम आहे असे समजावे. मित्र तोडांवर कडू बोलले तर आपले दोष त्यांना दिसले असे समजावे व मागे कडूबोलले तर मैत्री तुटली असेसमजावे.

या सर्वाविषयी आपली प्रतिक्रिया काय असावी याबद्दल महाराज सांगतात- गुरु, वृद्ध कडू बोलले तर त्यांची क्षमा मागावी व आनंदाने, ईर्षा मनात न धरता. सुधारणा करावी. मित्र कडू बोलले तर ईर्षा धरून सुधारणा करावी. बालकांच्या कडू बोलण्याची उपेक्षा करावी. स्त्री कडू बोलली असता तिचा (मानसिक?) त्याग करावा व सून कडू बोलली असता गृहत्याग करावा. जो बाप मुलांना न देता त्यांच्या समक्ष गोड खातो त्याला म्हातारपणी रडावे लागते. नात्यापेक्षा मैत्री श्रेष्ठ, कारण मित्र प्रेमामुळे दुसऱ्या जन्मातही उपयोगी पडतो. पित्याने सांगितलेल्या मोठ्या कार्यात आईचे अंग नसेल तर तिच्याशी खोटे बोलणे शोभते. याप्रमाणे आईवडिलांविषयी महाराजांनी व्यक्त केलेले विचार अशा प्रकारचेमार्मिक आहेत.

**सेवकासंबंधीची पथ्ये** - लहान अपराधाबद्दल रागावणाऱ्या व मोठ्याची क्षमा करणाऱ्या स्वामीजवळ तोंडपुजे सेवकच असतात. घरच्या सर्वांना काम करता आल्याने नोकर माजत नाहीत. केव्हा नोकराला शिक्षा द्यावी व केव्हा कानाडोळा करावा, शरणागताला अभय द्यावे, असे वागणाराचा संसार नेटका होतो.

**अतिथी** - अतिथीला स्वतःच्या भागातील काही द्यावे. कुटुंबाची प्रार्थना करून मगच त्यांच्या भागातील अतिथीला द्यावे. कारण कुटुंबही आपले अतिथीच आहे. मिळालेल्या सत्काराने आपणही असाचा सत्कार केला पाहिजे असे ज्याला वाटेल तोच पाहुणा. घरी अतिथी आला असता अनादर कधीच करू नये. यथाशक्ती दान अवश्य द्यावे. पण कुटुंबाला लंघन पाडून दान करणे हा धर्म नसून अधर्मच होय.

**दान अभय** देणारा हाच खरा दाता. अभयदान व अन्नदान हीच मोठी दाने आहेत पण त्यातही अभयदान अन्नदानापेक्षा श्रेष्ठ आहे कारण त्यात मनोविकारांचे फार मोठे दमन करावे लागते.

दान कशा करता करावे? तर महाराजा सांगतात की ''आपले काहीच नाही अशी बुद्धी दृढ होण्याकरता ''आपण पुष्कळांना फसवितो, पाश्वादिकांना तर नित्यच फसवित असतो म्हणून फसविणाऱ्या याचकांनाही दान देण्यास हरकत नाही. पैशाचा उपकार दुप्पट दिल्याने फिटतो. अन्नाचा उपकार देह दिल्याने फिटतो. दुसऱ्यास दान देण्याचा उपदेश करणारा व स्वतः दान देणे टाळणारा तो ठक होय. ''जवळ असल्यास यथाशक्ती देणे'' हा दात्याच गुण आण ''मिळेल त्यात संतुष्ट राहणे'' हा याचकाचा गुण होय. द्यावे मुठभरी दाणे । परी प्रेम करावा सहस्त्र वचने । जरी आपणा नाही देणे । तरी कवणाकडून तरी देयावे ।। विवाहात कन्येला आनंद देतांना, अलंकाराचा आग्रह धरू नये. औषधी द्याव्या किंवा कन्येच्या पुत्राच्या शिक्षणाची हमी घ्यावी. उत्सवाचे वेळी तिघांना जेवू घालावे. प्रथम बोलवावा निर्मत्सर विद्वान ब्राह्मण, दुसरा मूर्ख असला तरी परोपकार-संपन्न, तिसरा अत्यंत दारिद्री मग तो ब्राह्मण असला काय किंवा शूद्र चांडाळ, यवन यापैकी कोणीही असला तरी त्याला बोलवावे. चौथा बोलावून व्यर्थ खर्च करू नये.[१४]

**स्त्री आणि पुरुष** - धर्म, अर्थ वकाम हे तिन्ही परस्पर विरुद्ध पुरुषार्थ आहेत. धर्म म्हणजे सत्य. अर्थ हा सत्यासत्याचे मिश्रण. आणि काम हा केवळ असल्याने भरलेला. असा परस्पर विरोध असला तरी जेथे पतिपत्नीत परस्पर प्रेम असते, जेथे पतिपत्नी एकमेकात संतुष्ट असतात, तेथे हे तिन्ही पुरुषार्थ एकोप्याने राहून स्त्रीपुरुषांना कृतार्थ करतात. संपत्तीत सुखाचा वाटा समान घेतात व विपत्तीत एकाच वस्त्रावर दोघेही समाधान मानतात; अशा संसारात धर्म, अर्थ, काम परस्पर विरुद्ध कसे राहणार! म्हणून स्त्रियांचे खरे रक्षण करणे म्हणजे परस्पर प्रेमसंपन्न असणे हेच होय. असे महाराज म्हणतात.[१५]

एक वादी महाराजांना म्हणतो की स्त्रिया तर स्वभावतःच भ्रष्ट असतात, पतिव्रता कोणीच नसतात. यावर महाराजांचे उत्तर प्रतिपक्षाचा मुखभंग करणारे आहे. हे जर ''तुझे .... मत मान्य केले तर तुझी माताच नित्य व्याभिचारिणी आहे असे म्हणावे लागेल''. पुढे ते म्हणतात - विकार स्त्रीपुरुषांचे ठिकाणी सारखाच असतो. वासनारोध केला की दोघांनाही मोक्ष मिळतो.

महाभारतात स्त्रीची निंदा केली आहे तर बृहत्संहितेत स्त्रीची स्तुती आहे म्हणून शास्त्रकारांनी स्त्रीपुरुषांची समताच अंगिकारली आहे.[१६]

पुरुषाला वैराग्य व्हावे म्हणून स्त्रीची निंदा आहेव स्त्रीला वैराग्य व्हावे म्हणूणन पुरुषाची निंदा आहे. या दोन्ही निंदा वैराग्यपर्यवयायी आहेत. हे महात्म्यांचे हृद्‌गत समजून घ्यावयाला हवे. विनाकारण वाद माजविण्यात अर्थ नाही. बायकातील कजागपणा व पुरुषातील परोत्कर्ष असहिष्णुत्व हे दोष ज्या दिवशी निघून जातील त्या दिवशी नियम्य व नियामकाची आवश्यकताच मुळी राहणार नाही''[१७]

स्त्री पुरुषांपासून काय शिकावे? तर महाराजा म्हणतात, स्त्रीपासून प्रेम व पुरुषापासून धर्म. लौकिक कार्ये स्त्रियांच्या सल्ल्याने केल्यास हानी होऊ शकते पण धर्मकार्ये त्यांना कळविली असता हानी होत नाही. स्वस्त्रीजवळ महत्कार्यात खोटेबोलले असता गृहस्थास पाप लागत नाही. पित्याने नियुक्त केलेल्या कार्यात आईचे अंग नसलेतर आईशीही खोटे बोलणेशोभते. जी स्त्री पतीपेक्षा विद्येत व कलेत कुशल आहे तिच्या धर्मबुद्धिविषयी शंका घ्यावी. जिला गृहकाम करण्याची हौस नाही ती अवदसा म्हणावी. ज्याला स्त्रीच्या मदतीसाठी नौकर ठेवावे लागतात त्याचा अभ्युदय होत नाही. लौकर दारिद्र्य आणणारे काय आहे? तर- बायकोची माहेरावर प्रीती असून तिला अलंकाराची फार इच्छा असणे. स्त्री कोणास भीत नाही? - नित्य बाहेर राहणारा, नित्य घरात राहणारा, आईबापाचे न ऐकणारा, थुंकून भिंती खराब करणारा, झोपण्याशिवाय दुसरे काही न करणारा, ज्याची बाहेर जाण्याची व घरात येण्याची वेळ ठरली आहे, असा या सहांना स्त्री कधीही भीत नाही. पतीचे केव्हा ऐकू नये? तर - वैदिक धर्म सोडला असेल तेव्हा, आणि रोगी असून कुपथ्य मागणाऱ्या पतीचेच काय पण कोणाही वडिलांचे ऐकू नये.

**स्त्रीचे देवदर्शन** - तीन समजुतीवर स्त्रीला देवदर्शनास जाऊ द्यावे . १) स्त्रीच्या मनात देवदर्शनाचे येते तेव्हा तिला पतीपेक्षा देव वरिष्ठ वाटत असतो. २) पतिधर्मात न राहिली तर भागवत धर्मात तरी राहो. ३) ही निघूनच गेली तर

आपण काय करू शकतो? म्हणून देवदर्शनाला अडवून धर्माचे तरी अपराधी कां व्हावे?[१८]

स्त्री स्वतंत्र आहे की परतंत्र? - महाराज म्हणात या प्रश्नात काही अर्थ नाही. सर्वच स्त्रीपुरुष परतंत्र आहेत. नवऱ्याच्या आज्ञेवाचून स्त्रीने केलेला धर्म व्यर्थ आहे. त्याचप्रमाणे पतिव्रता स्त्रीने नको म्हटले असता तीर्थाला गेलेल्या ब्राह्मणाची यात्रा व्यर्थ झाली अशी पुराणात कथा आहे. स्त्री धर्माचे ठिकाणी दासी, अर्थाचे ठिकाणी मैत्रिण व कामाचे ठिकाणी स्वामिनी आहे असे महाराजांचेही स्पष्ट मत आहे.

**विवाहयोग्य स्त्री** - कुल, शील, रूप, यौवन या चार गोष्टी समान पाहिजेत. १) पतीपेक्षा रूपवती स्त्री कधीच अनुरक्त नसते. लज्जेमुळे ती शुद्ध राहिली तरी तिचे प्रेम लज्जेवर असते पतीवर नसते. २) कुलशीलाने श्रेष्ठ असलेल्या स्त्रीचे प्रेम शीलरक्षणावर असते पतीवर नव्हे, म्हणून केव्हा केव्हा ती आत्मघातालाही प्रवृत्त होते. ३) पतीपेक्षा स्त्री तरुण असल्यास अयत्नसाध्य आहे हे निश्चयाने समजावे. ४) श्रीमंताची कन्या पर्णून आणणे म्हणजे आपल्या वडिलांना त्रास देणे होय. ५) अतिबुभुक्षिताची कन्या घरी आणणे म्हणजे रानशेळी घरात घालणे होय. ६) म्हणून मध्यमाचीच कन्या करावी.[१९]

**स्त्रियांना उपदेश** - स्त्रीगीत संग्रह आणि लक्ष्मणराव केकरेंना पाठविलेल्या पत्रातील चातुर्य खंडात अतिशय सोप्या भाषेत स्त्रियांना पातिव्रत्याचा आणि सुशीलतेचा व्यावहारिक उपदेश केला आहे. तोहि थोडक्यात पाहू- सवतीवर देखील प्रेम करावे. वरिष्ठांबद्दल सर्वदा सेवावृत्ती ठेवावी. विपरीत झाले तरी क्रोध करू नये किंवा पतीवर द्वेषभाव ठेवू नये. मैत्रिणींना उचित असेल तर अवश्य द्यावे. सेवकांच्या आपदा नेहमी चुकवाव्या. असे केले तर त्या कामिनी धन्य होत नाही तर त्या कुलटा समजाव्या. दारिद्र्य आलेतरी पतिसेवा करावी. अतिथी, गुरु व देवतांना संतोष द्यावा.

**पतीचा त्रास जीवीं । इतरांसवेसुख ।**
**पतिव्रता स्त्रियांनी । त्यांचे पाहू नये मुख ॥१५॥**
**देवाची दंभपूजा । पतिलागी वांकडे ।**
**तिचा व्यर्थ गेला जन्म । कल्पभरी नरकी पडे ॥[२०]**

पतीचा कंटाळा आणि देवाची दंभपूजा असेल तर त्याचेफळ नरकवास हेच होय! आपण वडिलांचे आज्ञेत वागावे. निजकन्येला तसेच सांगावे. पतीला सत्कार्यात मदत करावी. पतीच्या सेवेत आनंद मानावा. सासु-सासऱ्यांना पूज्य मानावे. मुलांना गोड बोलून कुमार्गापासून वळवावे. कोणासी हट्ट करू नये. मधुरोत्तरी बोलावे. पतीने आणलेल्या सामानातून थोडे थोडे राखून ठेवावे. विपत्तीसमयी तेच पुरवावे. स्वयंपाक उत्तम करावा. जेवू घालण्याचा कंटाळा करू नये. जावानणंदावर प्रेमभाव ठेवावा. सासराला सुखाची ठेव मानावी, माहेरी जाण्याची हाव धरू नये. पांचवा संपादेल असा चौघांचा स्वयंपाक करावा. लेकुरांकरता अन्न झाकून ठेवावे संपतीत गर्व करू नये, विपत्तीत धैर्य सोडू नये. पतीस विनवून सन्मार्गी करावे. कोणासी तुसट वागू नये. सर्वांचाच विश्वास धरू नये. लीनता अंगी बाणवावी. गृहकृत्यात दक्ष असावे. मायबापांनी वाईट शिकविले तरी ऐकू नये. पती गावी नसेल तर क्रीडा, नटणे मुरडणे, उत्सवाला जाणे, हास्य विनोद आणि परगृही राहणे हे सर्व कटाक्षाने टाळावे.

## पुरुषासाठी चातुर्य शिक्षण

प्रातःकाळी उठावे. शरीरशुद्धीचा आणि स्नानसंध्यापूजेचा धर्म व्यवस्थित पार पाडावा व नंतर रोजचा व्यवहार काय तो सकाळीच चिंतून ठेवावा. योग्य वेळी निजावे. फुकट आळस धरू नये. वडलांना नमस्कार करावा. लहानांना शिकवण करावी. कार्य कोणते, अकार्य कोणते, यांचा चांगला विचार करावा, तोटा वारून व्यापार करावा. नफ्याचा एक अंश धर्मकार्यात खर्च करावा. दुसरा अंश साठवून ठेवावा. दोन अंशात प्रपंच राहटी उरकावी. शेती केली तर व्यापार बुडतो व व्यापार केला तर शेती बुडते अशा दोलायमान स्थितीत जो शेती करतो तो पुरुष धन्य होय असे महाराज म्हणतात. केव्हा सेवकांना शिक्षा करावी तर केव्हा कानाडोळा करावा. शरणागताला अभय द्यावे. दुर्बळाला चाळवू नये. उन्मताला वंदू नये. व्यवहारात अती लज्जा बाळगू नये. अगदी निर्लज्जही होऊ नये, थोड्याशा कारणाने सज्जनीच मैत्री तोडू नये. घरी अतिथी आला तर चित्तात अनादर ठेवू नये. यथाशक्ती दान द्यावे. नवे नवे मित्र जोडावे. होईल तोवरी द्वेष सोडावा. मित्रांच्या साह्याने मोठी कार्ये करावीत आणि आपणही त्यांना साह्य करावे. कुटुंबाला उपाशी ठेवून यज्ञदान करू नये. पैसा खर्च करताना लाभ किती ते पाहावे आपण उतावीळ वागलो तर आपल्यासारखे सर्व कुळच उतावीळ होईल म्हणून उतावेळ वागू नये. गांभीर्य धरावे अश्लील नाटक गीत शिकवून मुलांना चावट करू नये. त्यांना धर्म आणि व्यवहार शिकवावा. तो पुरुष संसारी अती धन्य![२२]

## सामान्य नीतिविवेचन [२३]

धर्मद्वेष करू नये. धर्मांतर करू नये. समाजाचा क्षोभ होईल असे करू नये. भांडणामध्ये ज्यावर धर्मसंस्कार थोडातरी असेल त्याचा पक्ष घ्यावा. व्यक्तीच्या द्वेषामुळे संपूर्ण जातीचा द्वेष करू नये काही ब्राह्मण वाईट असतील तरी ब्राह्मणाचा द्वेष करू नये. प्रयत्नाचा विश्वास धरावा पण मनाचा विश्वास न करावा. अंगीचा

फोड फोडतो त्याप्रमाणे आपल्या धर्माचा असला तरी वाईट व्यक्तीला दंडच द्यावा. आपल्या हाताखालील लोकांच्या स्तुतीवरून स्वतःविषयी मोठेपणा बाळगू नये. आपली उपाधी निवारणारा शत्रूही मोक्षपुरीला जावो असा आशीर्वाद देत जावा. अधिक आल्याविण बोलू नये. गुण कोणाचा सांडू नये. कोणाचाही दुर्गुण मुखावाटे उगाच बोलू नये. कला बहुत शिकावी, तिचा योग्य उपयोग करावा पण कलेच्या अधीन आपली वृत्ती करू नये. व्यसन लागू देऊ नये, पण व्यसनसाक्ष सोडू नये. दंभाचार करून जगात विख्यात होऊ नये. पोट भरण्यासाठी अनेक विद्यापरीक्षा दिल्या तरी पारमार्थिकाने त्यामागे जाऊ नये. भल्या लोकांचा शब्द खोडू नये. भांडाळासी तंडू नये. कुंटिनीपासूनही चातुर्य शिकत जावे. चिंतनात मग्न असावे, त्याने जनी उदासी दिसावे. क्षुद्र कार्यासाठी क्षुद्र लोक गुंतवावे व आपण आपली बुद्धी महत्कार्यात लावावी. आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्या आळशी तमोगुणी लोकांना कोणताही भलता उपाय करून रजोगुणी करावे. कोणाला अपाय करू नये. पण आपल्यालाही दुसऱ्याकडून अपाय होऊ देऊ नये. कोणाच्या मागे कोणाचा द्वेष व्यर्थ करू नये. आपले गुह्य सर्वाजवळ सांगू नये पण सुहृदाजवळ लपवू नये. दुर्बल सुहृदाचा गौरव करावा. आपले बरवेपण पाहून ज्याचे मन आपोआप आनंद पावते व आपले वाईट ऐकून ज्याला उगाचा खेद होतो, तोच उत्तम सुहृद समजावा. पित्याहून श्रेष्ठ समजावा. उपकाराकरता ईश्वरानेच त्याला पाठविले असे पक्के समजावे. अचतुराला गुरु करू नये. भिकाऱ्याला देखील उगीच कठीण बोलू नये. दाणे मूठभर द्यावेपण प्रेम सहस्त्रवचनांनी करावे. आपण देऊ शकलो नाही तर दुसरीकडून देववावे. भिकाऱ्याला दान द्यावे पण अन्तर्गृहात आणू नये. आपणाला सत्य वाट समजली तरी वृद्धांना स्पष्ट शब्दांनी निषेधू नये कारण व्यवहारात सर्वांनाच कष्ट असतात. परोत्कर्ष पाहून रुसू नये. प्रापंचिक कार्यासाठी देवाला नवस करू नये. ज्यांनी अनंत वेळा आपले हित केले त्यांच्यावर कुप्रसंग आला असता साह्याला जावे पण नम्रपणा सोडू नये. सुजन भेटले असता उगच व्रती होऊन बसू नये. परदेशात भिकेला लाजू नये. स्वदेशी भीक मागू नये. उन्हात विनाकारण वस्त्रांचा सोस करू नये. पावसात घर सोडून बाहेर जाऊ नये. धर्माविण रिकामे बसू नये. दैवाने रोग प्राप्ती झाली तरी चातुर्यवृत्ती भंगू देऊ नये. पौराणिकाला त्याचे गृहसुखदुःख पुसू नये. त्याच्या पुराणातून पूर्वजनकृतदुःखहर चातुर्यच शिकावे. कोणाचे अहित करू नये. पण शठ व्यक्तीशी सरळपणाने वागू नये. रागद्वेष करू नये. सलगीसाठी मरमर करू नये. जावयाचेनसल्यास मुहूर्तासाठी सहस्त्र जोशी मिळवावे. आणि दृढ उत्साह असेल तर ईश्वरासच गोष्टी पुसावी. दैवाच्या भरवंशावर राहून प्रयत्न सोडू नये. यत्न-गर्वे भगवन्निष्ठा सोडू नये. अंगी सामर्थ्य असेल तर कामनापूर्तीसाठी भगवंताला उगाच नवस करू नये. जा असे



स्पष्ट सांगू नये, यावयास विनवू नये. प्रेमावाचून रूसवा कोणावर ठेवू नये. कोणाबद्दल मन विटले तरी त्याचे व्यंग फोडू नये. उगाच गप्पा मारीत बसूनये. कीर्तीमागे लागूनये. पण वृथा अपकीर्ती सहन करू नये. रिकामे कधी बसू नये. ज्ञानासाठी, धर्मासाठी किंवा स्वतःच्या वा दुसऱ्याच्या सुखासाठी श्रम करीत राहावे. रिकामा असलेला द्वाड समजावा. नवे सत्य शोधून काढावे पण जुन्याचा विरोध करू नये. आपल्या तत्त्वांची मर्यादा इतकी वाढवावी की सर्व परकीय तत्त्वांना आपल्या संस्कृतीत पुरे जिरवून टाकावे. ''स्वव्यापकतेत रोधावे । परावे सकळ'' ।।५७६।।

कोणाचा आग्रह मोडू नये. नीच व्यक्तीला मान देऊ नये. धनासाठी धान्य विकू नये. घर बांधतांना तळघर बांधावे. आणि दरवाजांच्या मध्ये सोंडे म्हणजे धान्य साठविण्यासाठी पोकळ स्थाने असू द्यावीत. तोंडी शिवी नसावी. कोणाच्या कार्यात कधीही मोडा घालू नये. स्वतःसाठी द्रव्यव्यय कमी करावा. पण दीन अशा सज्जनासाठी मात्र आपले वित्त उडवावे. काळीज सुळी द्यावे पण सज्जनाला मृत्यूपासून अवश्य सोडवावे. दुसऱ्याचा प्राण जाईल असे सत्य बोलूनये. परमार्थी मनुष्याला त्या मार्गापासून भ्रष्ट करू नये. स्त्रीसह असल्याशिवाय गृहस्थाने धनसंग्रह करू नये. स्त्री नसेल तर पुत्रालाही धनयाचना करू नये. धर्मछळण करणारे, कुमती, सामर्थ्य असलेले किंवा गृहस्थ असे असूनही भिक्षा मागतात अशांना मूठभरही धान्य देऊ नये. मत्सरी असलेल्या विद्वानांची किंचितही संगती धरू नये. मूर्ख असला तरी निर्मत्सर असेल तर त्याला सांगाती करावे.

**दैनंदिन आवश्यक गोष्टी**

१) विसर्ग, २)गाईला चारा, ३) यशाशक्ती अतिथीसत्कार किंवा दान, ४) स्नान, ५) देवार्चन, ६) गुरुवृद्धसन्मान, ७) भोजन, ८) ग्रंथवाचन किंवा श्रवण, ९) व्यायाम, १०) निद्रा.

अशा प्रकारचा धर्माच्या अविरोधी नीतीचा उपदेश असून काही प्रश्नोत्तरातून महाराजांनी मार्मिक दृष्टी व्यक्त झाली आहे. म्हणून निवडक प्रश्नोत्तरे पाहू-

मोठी कामे केली असताही केव्हा शोभत नाही?
मनात अभिलाषा असते तेव्हा.
कार्यसाधु कोण?- मिष्टवक्ता.
कार्यविघातीकोण ? - क्रूरवक्ता.
कोणाचे गुणही दोषरूप असतात ? - निस्पृह नसून उद्धट असणाऱ्याचे.
सत्कर्म कोणते ? - जे केले असता पश्चातापाची पाळी येत नाही.
भयंकर कोण? - जीवावर उदार झालेले सर्वच. त्यातही मंत्रभेद करणारा फारच भयंकर. डोळ्यात तेल घालून त्याचा नाश करावा.

कोण कोण कोठे कोठे युक्तीची अपेक्षा करतो?- विषयी मूर्ख त्याला आवडते तेथे युक्तीची अपेक्षा करीत नाही व जे आवडत नाही तेथे युक्तीची अपेक्षा करतो. २) शहाणा आवडते तेथेही युक्तीची अपेक्षा करतो पण गुरुशास्त्र वाक्याचे ठिकाणी युक्तीची अपेक्षा करीत नाही. ३) नास्तिक सर्वत्र युक्तीची अपेक्षा करतो. ४) जीवन्मुक्त कोठेच युक्तीची अपेक्षा करीत नाही.

मित्र कसा करावा?- मित्राचे थोडेसेही वाईट ऐकल्याने वाईट वाटणे खऱ्या मित्राचे लक्षणच आहे.[२४]

नात्यापेक्षा मैत्री श्रेष्ठ आहे कारण तिच्यात भांडण होणे शक्य नाही. प्रेमात बिघाड आला की मैत्रीच नाश पावते. प्रेमामुळे मित्र दुसऱ्या जन्मातही उपयोगी पडतो. पण नातलग तर इहलोकातच धोका देणारे निघू शकतात.[२५]

लागटपणाने मित्र जोडू नये, पण सज्जन पुरुष घरी आले तर त्यांच्याशी प्रेमानेच वागावे.

अतिप्रिय मित्रासह व करण्यासारख्या गोष्टी कोणत्या?- एकांती त्याच्या स्त्रीशी भाषण करणे, आपत्काली त्याला मदत न करणे, त्याला दिलेल्या पैशावर व्याज लावणे वगैरे गोष्टी कितीही प्रिय मित्र असला तरी त्याचे बरोबर करू नये.

शत्रू होण्याचे मर्म कशात आहे?- वडिलांच्या शत्रुत्वाचे मर्म आज्ञाभंगात आहे. मित्राच्या शत्रुत्वाचे मर्म त्यांचे वाकडे करण्यात, पुत्राच्या शत्रुत्वाचे मर्म त्याला योग्य शिक्षण न देण्यात व स्त्रीच्या शत्रुत्वाचे मर्म तिचे अतिशय लाड करण्यात आहे. गुरुजन लवकर शत्रू होत नाहीत कारण त्यांना द्यावयाचे पुष्कळ असते, घ्यावयाचे थोडे असते. पुत्र पैशाला मालक झाल्यावर लवकर शत्रू होऊ शकतो. मित्राच्या स्त्रीशी एकांती भाषण केले असता व देवघेव करून व्याज लावले असता पुत्रापेक्षा तो लवकर शत्रू होतो. पण स्त्री ज्या ज्या वेळेस पतीकडून इच्छा पूर्ण होणार नाही त्या त्या वेळेस शत्रू होऊ शकते.

जगात अजातशत्रू कोण? - निस्पृह असून दयावान.

शत्रूला शरण केव्हा जावे? - आपले लोक आळशी असतील तेव्हा.

## शिक्षण

**कुप्रवृतात सत्प्रवृत्ती । शिक्षादि शब्द रूढ याच अर्थी ॥११७॥**

कुप्रवृत्ताला सत्प्रवृत्ती शिकविणे हाच शिक्षणाचा अर्थ आहे. जुने नष्ट न होऊन नव्याची भर पडेल ते खरे शिक्षण. दुसरीकडून गुण अवश्य घ्यावेत पण आपल्या कुळात जुने गुण असतील तर त्यांची उपेक्षा करू नये. संस्काराने जुन्या होणाऱ्या सर्व गोष्टी चांगल्या व अवस्थेने जुन्या होणाऱ्या वाईट. संस्काराने नव्या होणाऱ्या गोष्टी अविश्वसनीय व अवस्थेने होणाऱ्या नव्या गोष्टी चांगल्या, असे महाराजांचे मत आहे.



उपदेश कोणाचा ऐकू नये?- शास्त्रापेक्षा बुद्धी वरिष्ठ आहे असे समजणाऱ्याकडून. असे महाराज सांगतात. बुद्धीने कलाकौशल्याच्या बाबतीत स्वतंत्र असावे व धार्मिक संबंधात नेहमी परतंत्र असावे. शास्त्रे वाचूनही कोणाला बोध होत नाही?- आपली मते पूर्वीच ठरवून टाकून ती सिद्ध करण्याला शास्त्रे वाचतो त्याला शास्त्राभ्यास करूनही बोध होत नाही. शिक्षक अनुभवी जुनाच पहावा, वृष भव शिष्य नवीनच चांगला.

**जितुके आपणा ठावे । तितुके हळू हळू शिकवावे।**
**शहाणे करूनी सोडावे । सकळ लोका ॥**

या समर्थांच्या शब्दातील अर्थ महाराजांनी नेमका समोर ठेवला आहे. जितुके शब्दाने शिक्षकाची अपूर्णता समर्थ सूचवित आहेत. म्हणून दुसऱ्याला शहाणे करून सोडताना आपणही दुसरीकडून शहाणे होण्याचा सपाटा सुरू ठेवला पाहिजे.[२७]

या अर्थात शिक्षकावरील जबाबदारीवर महाराजांनी नेमके बोट ठेवले आहे. चुका कबूल करण्याची संवय असलेला आणि चुका लपवून ठेवण्याची सवय असलेला दोघेही सारखेच, पण जोचुका कबूल करून त्या अवश्य कमी करतो तो मात्र चांगला, असे महाराज म्हणतात.

जो मुलगा व्याकरण शिकण्याची इच्छा करतो त्याला बळेकरून गणित शिकवू नये. ज्याचा जिकडे आग्रह असेल तोच विषय शिकण्यासाठी त्याला अनुमोदन द्यावे. विद्या शिकविताना शिष्याचे लाड करू नये. आपला स्वानुभव गुरुजवळ नम्र वाणीने सांगावा, शिष्याला अज्ञानवचनांनी शिकवावा, सुहृदाचा गौरव करून त्याला शिकवावा, स्त्रियेला मात्र विश्वासरहित प्रीतिवचनांनी शिकवावा. लाडका शिष्य जर ऐकत नसेल तर त्याला मध्यसुहृत् समजावे. भांडस्त्रियेला उद्याची गोडी लावून आजची क्रिया तिजकडून करवून घ्यावी.

विद्वान आणि पोटभरू लोकांचा मूर्खाकडून पराभव करवावा. संस्कृताभिमानियाशी वाद करतांना लोकांच्या भाषेत करावा म्हणजे त्यांना लबाडी करता येत नाही. विश्वासू चाकरांना लिहिणे, वाचणे शिकवावे आणि वृक्ष व पशूंचा आयुर्वेद शिकवावा.

संस्कृत, स्वभाषा व राजभाषा आपण शिकाव्या आणि गृहिणीलाही शिकवाव्या. मुलींना व लहान मुलांना आईने शिकवावे. कला उत्तमप्रकारे पुष्कळ शिकाव्या पण कलेच्या स्वाधीन होऊ नये. पोटासाठी परीक्षा दिल्या तरी साधकाने त्यामागे लागू नये.

## शिक्षणाचे तत्व

साधुबोधात महाराज म्हणतात की, सृष्टीचा नियम असा आहे की बाल्यदशेत लालन, मध्य दशेत सुधारणा व उच्च दशेत स्वातंत्र्य हे बहुधा मिळत असते. पैकी

मध्यदशेतच महात्म्यांना शिष्यांवर रागावण्याची पाळी येते. कडेवर बसणाऱ्या मुलाचे पाय पक्के होत नाहीत त्याप्रमाणे मध्य दशेतही लालन केले असता शिष्यांना आत्मविश्वास उत्पन्न होत नाही. उपेक्षा मात्र अप्रेमाचीच द्योतक आहे. द्वेष मात्र महात्म्यांना कोठेच नसतो.

अंधारात आपले दोष गोड उब्दाने दाखवितो तो हितैशी समजावा. मनुष्य देव आहे की पशू?- तर त्यावर महाराज म्हणतात की मनुष्य विचाराने देव आहे व शरीराने पशू आहे. विचारात त्याची वागणुक देवाप्रमाणे हिताची होते. विचारांचा शरीरावर ताबा ठेवणे हेच मनुष्यत्व होय आणि हेच शिक्षणाचे ध्येय आहे. विचार न करता प्रसंगी ज्याल चांगले सांगता येते तो खरा बोलका होय.

शील संपन्न - शास्त्रानुसार वागणारा. कसाई - पूज्यांचा अपमान करणारा. कपटी - वारंवार शरण येऊन पुनः चुका करणारा. उद्धट- १ आपली चांगली कृत्ये प्रसिद्ध करून वाईटांना झाकणारा. २. बुद्धीच्या बळावर शास्त्रीय विषय समजतो असे म्हणणारा. ३. दुसऱ्याच्या दोषाने आपल्या क्रियेचे समर्थन करणारा; हे सर्व उद्धट होत.

## सुधारणा

अलीकडे सुधारणा या शब्दाला चलनी नाण्याचे स्वरूप आलेले आहे. त्यासंबंधी जुन्या सत्पुरुषांची निश्चित अशी मते सांपडणे कठीण आहे पण महाराज विसाव्या शतकाच्या सुरवातीला झाले असल्यामुळे त्यांची मते समजून घेणे आजच्याही काळात महत्वाचे आहे. रोजच नवनवीन सुधारणा होत असतात तरी सुद्धा सुधारणेचे मुख्य तत्व बदलत नाही, हे मात्र महाराजांच्या विवेचनाचे चिंतन कले असता स्पष्ट दिसून येते. भारतीय संस्कृती जगातील सर्वात जुनी संस्कृती आहे. तिचा जुनेपणा टिकून राहून नवीन सुधारणा कशा स्वीकारावयाच्या याचे सूत्र महाराजांनी प्रतिपादन केले आहे. या संबंधीचे साधुबोध या ग्रंथातील त्यांचे विचार अवलोकन करू. [२८]

**सुधारणा व दुर्धारणा** - आपली मानसिक व शारीरिक शक्ती कायम राहते. पैसा कमी लागतो, गरजा वाढत नाहीत, अशा व्यावहारिक गोष्टी घडवून आणणे म्हणजे सुधारणा. बाकी सर्व दुर्धारणा[२९] होत असे महाराजांचे मत आहे.

**सुधारणेचा मोठा दोष** - तसे पाहिले असता सुधारणेत महाराजांना मुळीच दोष वाटत नाही सुधारकातच दोष वाटतो सुधारणेने हळू हळू माणूसपणाच नाहीसा होत आहे. जे गाणे माणसाला यावयाचे ते ग्रामफोनने विकत घेतले आहे. माणसांची शक्ती यंत्रांनी घेतल्यामुळे व्यायामरहित अशी रोगी माणसे वाढत आहेत. दळणकांडण, विहीरीचे पाणी काढणे, हे चक्की व नळाने बंद झाले आहे, हे आपण पाहतोच. आणि हे असेच चालले तर यंत्र तोडून टाकण्याबद्दल कायदा न होवो म्हणजे झाले. म्हणून महाराज म्हणतात की, धर्माचे अवलंबन करून सुधारणेचे सार निवडून घ्यावे. ब्रह्मज्ञान व भक्तिवाचून- अति सर्वत्र वर्जयेत् । या म्हणीचा उपयोग करावा. बैलाप्रमाणे सुधारणेचे जूं खांद्यावर घेणे हे सुधारणावेड होय. कितीहि खटपट केली तरी सर्व मनुष्यांच्या सर्व सुखांकरता सुधारणा होणे शक्यच नाही. कारण एक सुधारणा झाली तरी दुसऱ्या सुधारणेची वासना वाढतच जाणार! सुखाची वासना भोगांनी कमी होत नाही वाढतच जाते- न भोगेन उपशाम्यति । असे तत्वच आहे.

महाराज म्हणतात की, ''**नको ही सुधारणा. रानटी असतो तर सुखाने खावयाला तरी मिळाले असते.**'' असे उद्‌गार ज्याच्या त्याच्या तोंडून बाहेर पडतील हे मी तातांची शपथ घेऊन सांगतो. हे महाराजांचे शब्द आजच्या युगात खरे होण्यास नुकतीच सुरवात झाली आहे. असे म्हणावयास हरकत नाही.

नवीन सुधारणेमुळे मनाची उच्च बाजू निकृष्ट होत आहे. प्रत्येक मनुष्याचे स्वास्थ्य नाहीसे होत आहे. सुधारणेपासून श्रीमंताचा पैसा पाण्यासारखा खर्च होत नाही. गरीबांच्या मनात कलहाचे उमाळे येत आहेत. आम्हाला गर्भदुःख कां दिले, असे प्रश्न स्त्रिया ईश्वराला विचारू लागल्या आहेत.

## सुधारणा व अनीती

भौतिक सुधारणा वाढली की अनीती वाढते कारण सुधारणेचे क्षेत्र संकुचित होण्यासाठी कायदे होतात, यावरून हे स्पष्ट दिसते. विमाने, आगबोटी, मोटारी वगैरे यंत्राकडे पाहिले म्हणजे हे सहज समजते. कारण त्यांनी सर्वांप्रमाणे चोरांनाही मार्ग खुला झाला आहे. पाश्चात्य देशातील गुन्ह्यांचे वाढते प्रमाणे महाराजांच्या या निष्कर्षाची सिद्धी करते. साध्या व्यापारापेक्षा स्मगलिंगचा व्यापार, काळाबाजार हाच अधिक प्रमाणात कार्यरत आहेत. त्यामुळे सरसकट सुधारणेपेक्षा सुधारणेचे सार निवडून घेणेच मानवाच्या हिताला आवश्यक आहे.

## आर्यांचि मुख्य सुधारणा

''कोणाला त्रास न देता सृष्टीमातेपासून मिळेल तितक्यात संतुष्ट राहून धर्माची दाढ करणे ही आम्हा आर्यांची मुख्य सुधारणा होय.'' असे महाराजांचे मत आहे.

याबरोबरच ते पुढे म्हणतात की, ''अशा स्थितीत दुसऱ्यापुढे आमचा निभाव लागणे कठीण आहे म्हणून आपद्धर्मानुसार उपयोग दृष्टीने सुधारणा मला मान्य आहेच. परंतु तींत दोन पथ्ये पाळली गेली पाहिजेत.

१) जुन्याचा बिमोड होऊ न देणे.

२) सर्वस्वी कृत्रिम जीविताच्या स्वाधीन न होणे.

यंत्राला बुद्धी नसल्यामुळे यंत्रावर अवलंबून राहणाऱ्या मनुष्यांची बुद्धीही

कमी होत असते. त्यामुळे गायन वादनाची कला निस्तेज होत आहेत. सर्वच कामे यंत्राकडून घेण्याची सवंय लागल्यामुळे मनुष्यातील गुण नाहीसे होतात. यंत्राने काही गोष्टी कायम राहत असल्या तरी नवीन शोधून काढणे मनुष्याच्या बुद्धीचे काम आहे. यंत्रे देखील मनुष्याच्या बुद्धीचेच परिणाम आहेत. पण मनुष्य यंत्राच्या स्वाधीन झाला तर त्याचा अभ्यास नाहीसा होऊन नवीन शोधही लागणे दुरापास्त होईल. यंत्राने काम घेतल्याने सुख होते हे खरे, पण त्यामुळे आपल्या सवयी नाहीशा करणे योग्य नाही. परक्या देशातून नवे कलाज्ञान अवश्य संपादन करावे पण जुन्याचा रास्त अभिमान मात्र सोडू नये. दिल्लीतील लोखंडाचा खांब, पुराणातील दैविक विमाने बृहत्कथेतील यांत्रिक विमाने विसरून जाऊ नयेत.

सुधारणा म्हणजे अनुकरण नव्हे किंवा अंधविश्वासही नव्हे.

कृत्रिम राहणीचा तर पाश्चात्यवादी निषेध करू लागले आहेत. फलाहार करणे, उघडे राहणे, इत्यादि त्यांना आवडू लागले आहे. याविषयी महाराजांनी अमेरिकन स्वभावचिकित्सावादियाचा दाखला दिला आहे. आजची सुधारणेची चढाओढ काही विलक्षण प्रकारची आहे. आम्ही पाश्चात्यांचे अनुकरण करू पाहतो तर ते आमच्या जुन्या चालींचे अनुकरण करू पाहत आहेत. पण सुधारणा म्हणजे अनुकरण नव्हे.

पुत्राने वंशाची सुधारणा करावी असे बापाला वाटते. सत्पुत्र ती करतोही पण त्याने वंशाचे खंडन होत नाही. अगदीच सुधारणा न करणारा किंवा वंशाला झुगारून देऊन भलतीच सुधारणा करणारा दोघेही मुळाला सोडीत असतात. म्हणून उपयोग दृष्टीने बेताची सुधारणा करावी.

परंतु आमच्यातील सुधारकांचा अभिमान धर्मवेडापेक्षाही भयंकर आहे. कारण एखादा वसिष्ठांची प्रशंसा करू लागला तर त्याला अंधविश्वासी म्हणून हे हसतात. कां तर अमका पाश्चात्य वसिष्ठांची चूक दाखवितो म्हणून. पण यावरही हे विश्वासच ठेवत असतात. जुन्या लोकांची बुद्धी शास्त्रातून उसनी आणली असते तर यांची दुसऱ्याच्या मुखसिंधूतून उसनी आली असते इतकेच. विवेकसिंधू आणि मुखसिंधू यातील फरक लक्षात आला म्हणजे नव्याजुन्याची तुलना चांगली होते.[३०]

हे सुधारणे संबंधीचे महाराजांचे विचार कोण्याही बुद्धिमानाला विचार करावयास लावणारे आहेत. समयोचित उपदेश वगैरे ग्रंथातही या संबंधी चांगले युक्तिवाद देऊन भारतीय जीवनपद्धतीचे आणि श्रेष्ठ विचारांचे महाराजांनी केलेले मार्मिक विवेचन मूळातून अभ्यासनीय आहे.

## बहुमत

आजच्या लोकशाहीच्या जमान्यात बहुमताच्या विरोधी बोलणे म्हणजे समाजाचा रोष ओढवून घेणेच आहे. पण विचार करताना खालचे वरचे, चांगले



वाईट, सर्व मुद्दे विचारात घेणे आवश्यक असते तेथे कोणाची भीडमुर्वत ठेवली तर बुद्धिवादाची बैठक म्हणजे बुद्धिनिष्ठाच भंग पावते म्हणून महाराजांनी एकमत आणि बहुमत यावरील मांडलेले विचार संक्षेपाने पाहू-

बहुमताने चालावे की थोड्यामताने चालावे?

अधिक महत्वाची गोष्ट थोड्यांना कळत असते म्हणून चांगल्या व महत्वाच्या बाबी थोड्या लोकांच्या मतानेच ठरत असतात. आणि तेच योग्य आहे. पण जी गोष्ट व्यावहारिक आहे तिजविषयी बहुमताने चालावे.

यासंबंधी महाराजांनी एक कल्पित कथा सांगितली आहे - एकदा एक सिंह फिरता फिरता कोल्ह्यांच्या कळपाकडे गेला. ते ओळखून कोल्ह्यांनी कुत्र्याने तोडलेले एक प्रेत सिंहाला अर्पण केले, व म्हणाले - ''तू आम्हाला खाऊ नको. हे भक्ष्य तुझ्यासाठी आणले आहे त्याचा स्वीकार कर.''

सिंह - ''तुम्ही मला भ्यालात इतकेच पुरे आहे. मी तुम्हाला खात नाही व तुम्ही चोरून आणलेले कुत्र्याचे उष्टेप्रेतही मला नको.''

यावर कोल्हे म्हणाले - ''तू आम्हापेक्षा थोर व शहाणा आहेस. शहाण्याने बहुमतानेच निर्णय केला पाहिजे. आमच्या आग्रहपूर्वक पाहुणचाराचा स्वीकार कर.''

सिंह- ''वय, विद्या, पैसा, शील, व्यसन (संकट) व कुळ यावरून समान असलेल्यांमध्येच बहुमताचा न्याय शोभतो. यातून एक जर एखाद्याला जास्त असेल तर त्याचे एकट्याचे मत प्रमाण धरले जाते. तुम्हा सर्वांचा मी एकटा फडशा पाडू शकतो. इतके माझे बळ असून तुम्ही चोरून आणलेले प्रेत मजपुढे केले हा माझा अपमानच आहे. पण तुम्ही भिऊन हे कृत्य केल्याने मी तुम्हाला क्षमा करीत आहे. मी तुम्हापेक्षा बुद्धीनेही थोर आहे. म्हणून माझ्यापुढे तुमच्या बहुमताची किंमत काय असणार! दहापाच मुले ओरडावयास लागली म्हणजे आईबापांनीही त्यांच्यामध्ये भुंकू लागावे काय?''

समान जातीत तरी बहुशा बलाचे काम बहुमताने व बुद्धीने काम एकमतानेच होत असते हे निर्विवाद म्हणून महाराजांनी निर्णय दिला आहे की,

**''समानशीलव्यसनी पुरुषात परस्पर न्याय बहुमतानेच होतो,**
**पण विशिष्ट शीलात एकमतानेच झाला पाहिजे.''**

## सारांश

याप्रमाणे आपण महाराजांनी केलेले नीतीशास्त्राचे विवेचन पाहिले. सुरवातीला नीतीच्या तात्विक विवेचनात पाश्चात्य मतांचा निरास करून भारतीय नीतिविचारांचे श्रेष्ठत्व प्रमाणे पुरस्स युक्तिवादांनी पटवून दिले आहे. पाश्चात्योंच खंडन केले असले तरी त्यातील त्याज्यांश सोडून दिला असता आणि भारतीय

विचारांची तत्वे त्यांत गोवली असता पाश्चात्यांचाच शब्दात भारतीय धर्म आणि नीती कशी मांडली जाऊ शकतात हे दाखविले आहे. यात महाराजांची समन्वय दृष्टी व्यक्त होते. त्याचप्रमाणे महाराजांनी सुधारणा अगदी टाकाऊ ठरविल्या नाहीत हे विशेष आहे. धर्मविचार सोडून इतर व्यवहारोपयोगी कला ज्ञान वगैरे सर्वात पाश्चात्यांसारख्याच नव्हे तर त्याहूनही जास्त सुधारणा करून आपण वरचढ झाले पाहिजे, असे त्यांचे म्हणणें आहे. पण त्यातही जुने न सोडण्याचा विवेक दाखविणे मात्र आवश्यक आहे असे त्यांचे मत आहे.

धर्मो, ज्ञानं, हरेर्भक्तिः पालनीयँ त्रयं सदा।
नीतिः कालानुरोधेन इति स्वमतनिर्णयः ।। य. १६.

धर्म, ज्ञान व भक्ती हे तिन्ही अखंड पालन करीत जावे आणि कालानुसार प्रसंगोपात्त नीतीचा अवलंब करावा, या स्वमतनिर्णयातील श्लोकात महाराजांनी भारतीय नीतिशास्त्रातील विशेष दाखवून दिला आहे.

## नीतिशास्त्र-टीपा

१) समयोपदेश पा. १६-१७ भा. १. २) साधुबोध प्रश्न ६१७, पा. २५१-२५२. ३) साधुबोध प्र. ६१७, पा. २५१. ४) समयोपदेश पा. १७ व साधुबोध पा. २५३. ५) समयोपदेश भा. १ पा. १७-१८. ६) प्रश्नोत्तरे, य १५ पा. ३३९. ७) साधुबोध प्र. ६१७ प्रा. ५४, ५५. ८) पत्र १५ य ७ पा. २४०, २४२. ९) गीतारहस्य, कर्मयोगशास्त्र पा. ६७-६८, ले. लो. टिळक, तिसरी आवृत्ती १९१८. १०) य ८, पा. ५२. ११) य ७, पा. ६०. १२) य. ८ पा. १९४. १३) साधुबोध पा. ३५९. १४) से. सू. इ. २०. पा. ८२५ १५) संप्रदायसुरतरू अ. २०, पा. २२८ संतुष्टे भार्यया भर्ता भर्त्रा भार्या यथैव च । यस्मिन्नेतत्कुले नित्यं त्रिवर्गस्तत्र वर्धते ।। यदा भर्ता च भार्या च परस्परवशानुगौ । तथा धर्मार्थकामानां त्रयाणामपि संगमः।। महाभारत वनपर्व अ. १८० १६) सं. सुरतरू अ २० पा. २३२. १७) तोंबा पत्र य. १२ पा. ४३. १८) य. ८, पा. १५. १९) य. ८ पा. ७७-७८. २०) य. ४ पा. ८ ते ११. २१) प्रियलीलामहोत्सव, अ. ११, ओ. ४७, पा. १६८, २२) लक्ष्मणराव केकरेंना पत्र य १३,पा. ४८ ते ५०. २३) संप्रदायसुरतरू, अ. २०, ओव्या ४९५ ते ८३२. २४) साधुबोध पा. ४५. २५) साधुबोध पा. १९८. २६) साधुबोध पा. ९-१०. २७) साधुबोध पा. ७९. २८) साधुबोध प्र, ८२५ ते ८३५ पा. ३४५ ते ३५१. २९) य ८ पा. ५८. ३०) य ८, १९७-१९८.

०००

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.